( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता )

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३-अ/पदो/ राखीव पोउपनि ते राखीव पोनि /९७/२०२२, मुंबई, दिनांक- १८ /०७/२०२४

**वाचा :-** १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दि. ०१/०८/२०१९

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ०७/०५/२०२१

३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दि. १४/०७/२०२१

**-: आदेश :-**

उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात येत असून, दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या अधिका-यांना त्यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार पदोन्नती कोटयातील राखीव पोलीस उप निरीक्षक यांना राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्रापात्रता तपासण्यात आली असता, खालील नमूद राखीव पोलीस उप निरीक्षक यांना राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीने पात्र ठरविले आहे. खालील नमूद अधिकारी यांना राखीव पोलीस निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि. १४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल विभाग वाटप करण्यात आलेले आहेत.

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील नमूद १२ राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना, त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून **" राखीव पोलीस निरीक्षक "** या पदावर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ५ मधील घटकांत करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी मान्यता दिली आहे. :-

| अ.क्र. | राखीव पोलीस उपनिरीक्षक यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप महसुल विभाग | राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | संतोष दादाजी पाटील | महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक | नाशिक | महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक |
| २ | राजेश रामबरन पांडे | यवतमाळ | नाशिक | नंदूरबार |
| ३ | पोपट किसन कापरे | ठाणे शहर | कोकण १ | पालघर |
| ४ | शिवाजी माधवराव पाटील | हिंगोली | छ. संभाजी नगर | पोलीस प्रशिक्षण केंद्र, लातूर |
| ५ | विजय आसाराम कदम | महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक | नाशिक | महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक |
| ६ | चतरसिंग गणपतसिंग सोळंके | पो.प्र.केंद्र, अकोला | नाशिक | महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक |
| ७ | अश्विन पुंडलिक जाधव | पो.अ., छत्रपती संभाजीनगर | छ. संभाजी नगर | पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना |

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | राखीव पोलीस उपनिरीक्षक यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप महसुल विभाग | राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ८ | अजय विनायक शेवाळे | पो.प्र.केंद्र, नागपूर | अमरावती | पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला |
| ९ | संतोष दामोदर उमराटकर | पो.प्र.केंद्र, नानवीज दौंड | कोकण २ | मुंबई शहर |
| १० | विलास नारायण कदम | पो.प्र.केंद्र, मरोळ | पुणे | पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची, सांगली |
| ११ | ओमाजी देवाजी सातपुते | पालघर (पो.आ., बृहन्मुंबई येथे बदलीवर कार्यमुक्त ) | पुणे | पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर |
| १२ | संजीव महादेवराव नागे | पो.प्र.केंद्र, अकोला (लोहमार्ग, नागपूर येथे बदली आदेशित) | पुणे | पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर |

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

(१) शिक्षा प्रस्तावित/ चालू झाली असल्यास,

(२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास,

(३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास,

(४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

४. सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

५. पदोन्नती झालेल्या राखीव पोलीस निरीक्षक यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करण्यापूर्वी ते ज्या घटकांत जाणार आहेत, त्या घटक प्रमुखांकडे रिक्त पदांची खात्री करुनच त्यांना कार्यमुक्त करावे. रिक्त पद नसल्यास तसे ह्या कार्यालयास कळवावे.

६. सदर पदोन्नती आदेशामधील राखीव पोलीस उप निरीक्षक हे जर आदेशामध्ये नमूद केलेल्या घटकामध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते ज्या घटकात कार्यरत आहेत, त्या घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे हया कार्यालयास न चुकता कळवावे.

**७. पदोन्नत झालेले अधिकारी यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.**

**रश्मि शुक्ला**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह )
पोलीस आयुक्त, ठाणे शहर / मिरा भाईंदर, वसई विरार
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

Scanned with OKEN Scanner

परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती / छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, छत्रपती संभाजीनगर / कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई / नाशिक परिक्षेत्र, नाशिक

पोलीस अधीक्षक, यवतमाळ / हिंगोली / छत्रपती संभाजी नगर / पालघर / लोहमार्ग, नागपूर / नंदूरबार/

प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला / नागपूर / मरोळ, मुंबई / नानवीज दौंड, पुणे / लातूर / जालना / सांगली / सोलापूर

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई

महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ / महाराष्ट्र राज्य, नागपूर -२

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई

२. यांनी सदरचे आदेश राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना राखीव पोलीस निरीक्षक ( RSI to RPI Promotion) या पदावर पदोन्नती या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov. in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

कार्यासन अधिकारी, का.क्र. २/ ९/ ११/ ११-अ/ ३६/ ४०

( संजीव कुमार सिंघल )<br>
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),<br>
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.

Scanned with OKEN Scanner